सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग
प्रधान कार्यालय, सिंधुदुर्गनगरी
फोन नं. ०२३६२- २२९००५ ते २२९०१० ई मेल - sindhudurgdcc@gmail.com

जा.क्र. कर्ज/९९९/३१/४५४३ /२०१३-१४ दि.१२/०३/२०१४

# परिपत्रक क्र. २३

**विषय :-** 'सोने तारण कॅश क्रेडीट' धोरण अंमलबजावणीबाबत.

आपल्या बँकेमार्फत सोनेतारणावर कर्ज आदा केले जाते. सदरचे कर्ज हे शेतकरी, व्यापारी, व्यावसाईक यांना त्वरीत उपलब्ध होत असते. मात्र कर्जाची मुदत १ वर्ष असलेने मुदतीपूर्व कर्ज परतफेड केल्यास कर्ज खाते बंद करून घेवून तारण दागिने कर्जदारास परत केले जातात. कर्जदारास पुनःश्च आर्थिक गरज निर्माण झाल्यास त्यास सोनेतारण कर्जासाठी पुनःश्च नवीन कागदपत्रे, बॉण्ड इ. पूर्तता करून पुनःश्च नवीन कर्ज मागणी करावी लागते. यासाठी कागदपत्रे, बॉण्ड, सराफ फी इ. साठी खर्च करावा लागतो. तसेच बँकेसही नव्याने सर्व कागदपत्र करावे लागतात. याकरीता मा. संचालक मंडळ सभा दि. २८.०२.२०१४ मधील निर्णयानुसार, खालीलप्रमाणे नव्याने 'सोनेतारण कॅश क्रेडीट' ही कर्ज योजना धोरणामध्ये समाविष्ठ करण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी दि. १.०४.२०१४ पासून करण्यात यावी.

०१. **योजनेचे नांव** :- सिंधु बँक सोनेतारण कॅश क्रेडीट योजना

०२. **कर्जाचा उद्देश** :- बँकेच्या नाममात्र सभासदास स्वतःचे मालकीचे सोने ऐवजावर धंदा, उद्योग, व्यापार यांचे खेळते भांडवली खर्चासाठी / शेती व शेतीपूरक व्यवसायासाठी इ. कारणाकरीता कर्ज आदा करण्यात येईल.

०३. **कर्ज मर्यादा** :- किमान रू. १ लाख व कमाल रू. १० लाख पर्यंत

रू. १ लाख खालील कर्ज हे प्रचलित धोरणाप्रमाणे अल्प मुदत स्वरूपाचे राहील.

०४. **कर्जदार पात्रता** :-
१. सेव्हिंग्ज ठेव खातेदार असणे आवश्यक आहे. कर्ज मागणी वेळी सेव्हिंग्ज खातेदार नसल्यास कर्ज मंजूरीवेळी खातेदार होणे आवश्यक आहे.
२. बँकेचा नाममात्र ('ब' वर्ग) सभासद असणे आवश्यक आहे.

०५. **कर्जाची मुदत** :- एक वर्ष राहील. सदरचे कर्ज कॅश क्रेडीट प्रकारात १ वर्ष मुदतीने असल्याने पुढील वर्षातील याच तारखेच्या आदीचा दिवस (तारीख) ही कर्ज मुदत राहील.

०६. **कर्जाची परतफेड** :-
१. कर्ज दिलेल्या तारखेपासून एक वर्ष / मुदत संपणेपूर्वी अगर मुदत संपणेचे तारखेस कर्ज खात्याचे नुतनीकरण अगर कर्जबाकी निरंक केली पाहिजे.
२. कर्ज मुदतीनंतर एक महिन्याचे आत कर्जाचे नुतनीकरण केले नाही तर तारण दिलेले सोने जाहिर लिलावाने विक्री करून कर्ज वसूली केली जाईल.
३. कर्ज खात्यावर सलग ९० दिवस उलाढाल न झालेस सदर कर्ज खाते अनुत्पादक (NPA) समजणेत येईल. त्याप्रमाणे पुढील ९० दिवसात उलाढाल न झालेस सहा महिन्यांनंतर सदर दागिन्यांची लिलावाद्वारे विक्री करून कर्जाची व्याजासह वसुली केली जाईल. याकरीता येणारा खर्च कर्जदाराचे खाती नांवे लिहिला जाईल.

४. सोनेतारण कॅश क्रेडीट कर्जाची मुदत १ वर्षे राहील १ वर्षानंतरही कर्जाची आवश्यकता असल्यास मुदत संपणेपूर्वी कर्जाचे नुतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

५. नुतनीकरण करताना व्याजासहीत रक्कमेचे नुतनीकरण केले जाणार नाही.

६. कर्ज मंजूरी व नुतनीकरणाचे अधिकार शाखाव्यवस्थापक यांना राहतील.

७. कर्ज नुतनीकरणासाठी सोने फेरतपासणी/मूल्यांकन करणेची आवश्यकता नाही.

८. सदर योजनेंतर्गत कर्ज नुतनीकरण मंजूरीनंतर जास्तीत जास्त दोन वेळा करणेत येईल. तद्नंतर नुतनीकरण आवश्यक असल्यास नव्याने कर्ज मंजूर करता येईल.

०७. **व्याजदर** :- सदर कर्जाचा व्याजदर १४% राहील. नियमाप्रमाणे थकबाकीवर २% दंड व्याज आकारणी करण्यात येईल. वेळोवेळी व्याजदरामध्ये बदल करण्याचे अधिकार मा. संचालक मंडळास राहतील.

०८. **कर्जास तारण** :- सोने ऐवज (सोन्याची बिस्कीटे वगळून) कर्जासाठी तारण म्हणून स्विकारण्यात येणारे दागिने संबंधित कर्जदारांच्या स्वत:च्या मालकीचेच असले पाहिजेत. नथ, कुडी, तुटलेले दागिने, लाखी दागिने तारण म्हणून स्विकारले जाणार नाहीत.

०९. **मूल्यांकन** :- १. कर्जासाठी तारण घेतलेल्या दागिन्यांचे मुल्यमापन, त्यासाठी बँकेने नेमलेल्या अधिकृत सराफांकडून करून घेतले जाईल. त्यासाठी बँकेने ठरविलेल्या दराने सराफ फी ची रक्कम कर्जदाराने बँकेला द्यावयाची आहे.

**२.** सराफाने आपल्या अहवालांत संबंधित तारण दागिन्यांचे जेवढे चोख वजन दाखविले असेल त्या वजनाच्या प्रमाणात बँक वेळोवेळी ठरविल त्या प्रमाणात कर्ज वितरण करण्यात येईल. असे प्रमाण सोन्याच्या बाजारभावाशी निगडीत असेल. बाजारभावामध्ये आकस्मिक मंदी आली आणि त्यामुळे कर्जाला तारण असलेल्या दागिन्यांची किमंत बँकेस अपुरी वाटली तर अपुऱ्या दुराव्याची रक्कम बँक सांगेल त्या प्रमाणात कर्जदाराने ताबडतोब कर्जखात्यात भरणा करावयाची आहे. किंवा पुरेशा किंमतीचे सोन्याचे दागिने जादा तारण म्हणून कर्जदाराने बँकेकडे द्यावयाचे आहेत.

३. सद्यस्थितीत १० ग्रॅम निव्वळ सोन्याचा भाव रू. ३२,०००/- गृहित धरून सदर किंमतीचे ७५% प्रमाणे रू. २४०००/- सोनेतारण कॅश क्रेडीट आदा करता येईल. बाजारपेठेतील चढ उतार विचारात घेवून त्याप्रमाणे वेळोवेळी मूल्यांकन रक्कम निश्चित करणेचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील.

१० **मूल्यांकन फी** :- १. किमान रू.४००/- व कमाल रू. १०००/- पर्यंत राहील.

२. रू. १,००,०००/-च्या पुढील कर्जास हजारी व त्याच्या भागास

रू. २/-(रूपये एक लाखपेक्षा अधिक कर्ज घेणाऱ्यांसाठी रू. ४००/- त्यापुढील रक्कमेवर हजारी रू. २/- या प्रमाणे)

३. वरील दराने तारण दागिन्यांवर मुल्यांकन फी आकारुन संबंधित कर्जदाराकडून वसुल करुन घेवून ती सराफ मुल्यांकन फी खाती जमा करावयाची आहे. अशाप्रकारे मुल्यांकन फी खाती जमा होणारी रक्कम सहामाही अखेर या खात्यास नावे लिहून त्यामधून १५% दराने सुरक्षा ठेव व आवश्यक ती करदेयतेची रक्कम कपात करुन घेवून उर्वरित रक्कम सहामाही अखेर संबंधित सराफाच्या सेव्हींग खाती जमा करावयाची आहे.

११ **अन्य चार्जेस** :- **१. कस्टोडियन चार्जेस :-**

कर्जाची मुदत संपलेनंतर कर्जबाकी पूर्ण फेड केल्यास व त्यानंतर दागिना ताब्यात न घेतल्यास कस्टोडियन चार्जेस म्हणून १० ग्रॅम पर्यंत रू. ६०/- याप्रमाणे व त्यापुढे प्रति ग्रॅम रू.२०/- प्रति महा वसूल करणेत येतील.

**२. इन्शुरन्स चार्जेस :-**

तारण म्हणून स्विकारण्यात येणाऱ्या दागिन्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यकतेनुसार आगीचा व चोरीचा इत्यादी कारणासाठी विमा बँकेमार्फत उतरविण्यात येईल. यासाठी विमा शुल्क म्हणून चोख सोन्यासाठी प्रति ग्रॅम रू.५/- प्रति वर्षी याप्रमाणे आकारणी करणेत येईल. प्रत्येक नुतनीकरणाच्या वेळी इन्शुरन्स चार्जेस घेणेत यावेत.

**३.** 'ब' वर्ग फी म्हणून रू. २५/- प्रथम कर्ज मंजूरी वेळी घेतली जाईल. सदर कर्जाच्या पुढील दोन वेळच्या नुतनीकरणासाठी सदरची फी आकारण्यात येवू नये.

४. कर्जासाठी आवश्यक मुद्रांक शुल्काचा खर्च कर्जदाराने करावयाचा आहे.

५. सेवाशुल्क/प्रोसेसिंग चार्जेस, छाननी व मूल्यांकन फी, प्रिंटींग, पोष्टेज इ. करीता कोणतीही फी आकारणी करण्यात येवू नये.

१२. **कर्जाची व्याज आकारणी** :- दैनंदिन पध्दतीने मासिक व्याज आकारणी (कॅश क्रेडीट पध्दतीप्रमाणे) केली जाईल. तसेच दरमहा व्याजाचे रक्कमेइतपत उलाढाल झाली पाहिजे.

१३. **अन्य मुद्दे** :-

१. सोनेगहाण दागिने शाखा सराफ (व्हॅल्यूअर) व कर्जदार यांचे संयुक्त सहीने शाखाव्यवस्थापक यांचे समक्ष सील करून घेणे.
२. किमान ३ ग्रॅम वजनाचे दागिने स्विकारले जातील.
३. सोनेतारण कॅश क्रेडीट कर्जदाराला खात्यावर व्यवहार करणेसाठी चेक बुक देणेत येईल.
४. शाखा सराफ किंवा त्यांचे कुटुंबिय अगर सराफी पेढया इ. यांना कर्ज देता येणार नाही.
५. स्त्रीधनामधील मंगळसुत्र हा दागिना स्त्रीचे 'सौभाग्यलेणे' असल्यामुळे मंगळसुत्र तारण ठेवून कर्ज घेण्यास पुरुष कर्जदार आल्यास त्या कर्जदाराने संबंधित स्त्रीकडून विहीत नमुन्यातील संमत्तीपत्र

साक्षीदारांचे सही व पत्त्यासह स्वतंत्रपणे सादर केले पाहिजे. सदर साक्षीदार हा बँकेचा खातेदार असणे आवश्यक आहे. असे संमत्ती पत्र सादर केल्याशिवाय तारण दागिना स्विकारला जाणार नाही.

**६.** कर्जापोटी तारण दागिने स्वीकारल्यावर बँकेचेवतीने सहीचे अधिकार असलेल्या अधिकृत अधिकारी/ कर्मचारी यांचे सहीने कर्जदारास बँकेकडून पोहोच पावती दिली जाईल. सदर पोहोच पावती कर्जदाराने कर्जफेड करून दागिने सोडवून नेताना बँकेकडे सादर केली पाहिजे. पावती हरवल्यास रू. १००/- च्या बॉण्डपेपरवर विहित नमुन्यात हमीपत्र देणे आवश्यक राहील.

७. सदर कर्ज व्यवहारासाठी बँकेने सोनेतारण कर्ज व्यवहारासाठी पुरविलेल्या स्वतंत्र पावती पुस्तकाचा वापर शाखा व्यवस्थापक यांनी करावयाचा आहे.

८. कर्जदाराने विहीत नमून्यामध्ये बँकेकडे नामनिर्देशन केले पाहिजे. कर्ज पुर्णफेड करून तारण ऐवज परत नेणेपुर्वी कर्जदाराचा मृत्यु झालेस नामनिर्देशित व्यक्तीस/हक्कदार वारसास कर्ज फेड करून घेवून आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करून घेवून तारणऐवज दिला जाईल.

९. सदर कर्जदाराकडून बँकेच्या इतर खात्यावर काही येणे असल्यास त्यासाठी तारण वस्तु राखून ठेवण्याचा अधिकार बँकेस राहील.

१०. सदर कर्जाकरीता कॅश क्रेडीट योजनेचे सर्व निकष (**NPA** सह) लागू राहतील. तसेच या कर्जासाठी **'बुलेट रिपेमेंट ऑप्शनची'** सवलत लागू राहणार नाही.

११. तारण सोनेतारण ऐवज जास्तीत जास्त कर्ज रक्कमेच्या दुप्पट रक्कमेपर्यंत स्विकारले जातील. त्यापेक्षा जास्त रक्कमेचे ऐवज स्विकारले जाणार नाहीत.

१२. कर्जाची प्रत्यक्ष उचल केल्यापासून (नांवे नोंदीच्या पहिल्या दिनांकापासून) कर्जाच्या मुदतीचे तारखेपर्यंत मंजूर मर्यादेवर ठरविलेल्या व्याजदराने जेवढे व्याज होईल त्याच्या किमान १/४ एवढे व्याज बँकेला (वेळोवेळी नांवे टाकलेले व्याज धरून) मिळाले पाहिजे. वेळोवेळी नांवे टाकलेले व कर्जाच्या पूर्णफेडीच्या दिवशी नांवे टाकलेले व्याज मिळून व्याज अशा किमान व्याजाच्या रकमेपेक्षा कमी होत असेल तर कर्जाच्या परत फेडीचे दिवशी त्या किमान व्याजाच्या फरकाची रक्कम कर्जदाराच्या खाती नांवे लिहिणेत येईल.

१३. मंजूर कर्ज रक्कमेपैकी काही रक्कम भरणा करून दागिने सोडवून नेता येणार नाहीत.

१४. सदर कर्जाकरीता **डेबुक कोड नं. १८४०२ व ॲक्टीव्हीटी कोड** ३२२२०४०९९F राहील.

१५. सदर कर्ज योजनेकरीता कर्ज मागणी अर्ज व कागदपत्रे छपाई करून शाखांना उपलब्ध करून देण्यात येतील. नवीन फॉर्म छपाई करून मिळेपर्यंत सद्याचाच सोने तारण कर्ज मागणी अर्ज वापरण्यात यावा. फॉर्मवर लाल शाईने **'सोनेतारण कॅश क्रेडीट'** असा स्पष्ट उल्लेख करावा. सदर कर्जावरील व्यवहाराकरीता स्वतंत्र चेकबुक देण्यात यावे.

सदर परिपत्रकाची प्रत सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावी. तसेच शाखेचे नोटीस बोर्डावर योजनेची प्रसिध्दी करणेत यावी. योजनेचा प्रसार व प्रचार करून 'सोनेतारण कॅश क्रेडीट' ह्या योजनेचा लाभ जास्तीत जास्त सभासदांना देणेसाठी प्रयत्न करावेत.